रजि. नं. : ई -६९, अहमदनगर

# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

शिर्डी : पोस्ट : शिर्डी - ४२३ १०९, ता. राहाता, जि. अहमदनगर, महाराष्ट्र (भारत).
दुरध्वनी : + ९१-२४२३ - २५८५०० फॅक्स : + ९१-२४२३-२५८ ७७०, टेलिग्राम : साईनाथ, शिर्डी.

जा.क्र.एसएसएस/वरिष्ठ महाविद्यालय/ 1321 /२०२२

दि. 30 JUN 2022

प्रती,
मे.--------------------------------------
--------------------------------------
--------------------------------------
--------------------------------------

**विषय – श्री साईबाबा महाविद्यालय – संदर्भ पुस्तके खरेदीकरिता मूळ छापील किमंतीवर सुटदर मागणीपत्र...**

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे वरिष्ठ महाविद्यालयाचे **ग्रंथालयाकरिता संदर्भ पुस्तके** खरेदी करावयाचे आहेत. त्याचा प्रकाशन व शाखानिहाय तपशिल सोबत जोडलेला आहे. सुटदर निश्चित झाल्यानंतर पुस्तके पुरवावे लागेल. त्यासाठी खालील अटी – शर्ती राहातील-

**अटी/ शर्ती**

१. सोबत जोडलेल्या प्रकाशनाच्या प्रकाशन व शाखानिहाय पुस्तकांचे मुळ छापील किमंतीवर शिर्डी पोहचचे, G.S.T.सह सर्व कर व खर्च समावेशक **सुटदर** द्यावेत. हमाली, वाहतुक अगर कुठलाही खर्च स्वतंत्र दिला जाणार नाही.
२. पुस्तकांचा पुरवठा, पुरवठा आदेश मिळाल्यानंतर १५ दिवसांचे आंत करावा लागेल.
३. संस्थानकडून कोणत्याही प्रकारची आगाऊ रक्कम (Advance) दिली जाणार नाही.
४. श्री साईबाबा महाविद्यालय, शिर्डी हे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न असल्याने, विविध विषयांची वर्गनिहाय संदर्भ पुस्तके नियोजित अभ्यासक्रमानुसार असावीत.
५. आपले फर्मचे लेटर हेडवर सिलबंद पाकिटातील दरपत्रक शिर्डी येथे वेळेवर पोहचणे आवश्यक आहे. दरपत्रक देतांना **"श्री साईबाबा महाविद्यालय – पुस्तके खरेदीचे दरपत्रक"** असा पाकिटावर स्पष्ट उल्लेख करावा.
६. **मागणी न केलेल्या प्रकाशनांचे दर देऊ नयेत, ते ग्राह्य धरले जाणार नाहीत.**
७. कोणतेही दरपत्रक स्विकारणे अथवा नाकारणे अथवा सर्व दरपत्रके नाकारणे याबाबतचा अधिकार संस्थान प्रशासनाने राखून ठेवला आहे. त्याची कारणे देणे संस्थानवर बंधनकारक राहणार नाही.
८. शिर्डी संस्थान ही धर्मदाय संस्था असल्याने दरात जास्तीत जास्त सवलत देणेस विनंती.
९. **दरपत्रकासोबत GST क्रमांक नमुद करावा. GST क्रमांक लागू नसल्यास तत्सम प्राधिकरणाकडील नोंदणी क्रमांक नमुद असलेल्या लेटरहेडवरच दरपत्रक देण्यात यावे. तसेच सोबत पॅनकार्डची छायांकित प्रत जोडावी.**
१०. मूळ छापील किमंतीवर सुट दरपत्रके दि. 16 JUL 2022 अखेर पोहोच करावेत. त्यानंतर आलेल्या सुट दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही.
११. सदर व्यवहारात काही वाद झाल्यास तो राहाता/कोपरगांव न्यायालयाचे न्यायकक्षेत राहील.

कळावे, श्री साईबाबांचे शुभशिर्वादांसह .

(राहुल जाधव)
**उप मुख्य कार्यकारी अधिकारी**
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

Scanned with CamScanner